॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.३० ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठास सुवर्णपदक, व्याख्यानमाला, शिष्यवृत्ती वा इतर माध्यमातून देणगी दिलेल्या देणगीदारांची माहिती अद्ययावत करण्याचे काम सुरु असून देणगीदारांनी आपली माहिती विद्यापीठास कळवावी असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

विद्यापीठास सुवर्णपदक, व्याख्यानमाला तसेच शिष्यवृत्तीसाठी विविध संस्था अथवा नागरिकांनी देणगी दिलेली आहे. याशिवाय काही संस्थांकडून विविध वस्तू देखील (उदा. सायकली, छत्र्या, वेंडींग मशिन्स, क्रीडा स्पर्धांसाठी प्रायोजक) देण्यात आल्या आहेत. यातील अनेक देणगीदारांकडून देणगी देण्यास मोठा कालावधी लोटला आहे. यातील काही देणगीदारांचे पत्ते बदलले आहेत. या सर्व देणगीदारांची माहिती, पत्ता व संपर्क क्रमांक, ई-मेल आदी माहिती अद्ययावत केली जात आहे. जेणेकरून त्यांच्याशी संपर्क साधता येईल. तरी विविध माध्यमातून विद्यापीठाला देणगी दिलेल्या देणगीदारांनी दि. ६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत देणगीदारांनी प्रशांत बोथरा (संपर्क क्रमांक 9422348639) यांच्याशी संपर्क साधावा अथवा व्हॉटस्अप द्वारे माहिती द्यावी असे आवाहन विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील यांनी केले आहे.

**बातमी नं. २**

जळगाव दि.३० ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात झालेल्या मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अंतर्गत विजय कुडे यांच्या सहस्त्रभावधारा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

विजय कुडे यांनी विविध भावगीते सादर करून त्यातील सौंदर्य उलगडून दाखविले. मराठी भावगीते व्यथा व विवंचना यातून बाहेर पडण्यास मदत करतात असे मत त्यांनी मांडले. त्यांनी ना.घ. देशपांडे, भा.रा. तांबे, माधव पाटकर, गजानन वाटवे, बबनराव नावळीकर, कुसूमाग्रज यांची भावगीते सादर करून रंगत आणली. संशोधन केंद्राचे संचालक प्रा. म.सु. पगारे यांनी अध्यक्षीय समारोप केला. डॉ. प्रिती सोनी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. स्नेहा गायकवाड यांनी आभार मानले.

---

जा क्र. कबचौउमवि/१६/ बातमी/२०२५ दि ३० जानेवारी, २०२५

प्रति

मा. संपादक

कृपया वरील बातमी प्रसिध्दीस देऊ सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी